SHIVAJI COLLEGE HINGOLI RESEARCH JOURNEY

Impact Factor – 6.625

E-ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

January-February-March 2021

Vol.-VIII, Issue-I (B)

**Chief Editor -**
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV's Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

**Executive Editors :**
Dr. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

*Our Editors have reviewed papers with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers. Nobody can republish these papers without pre-permission of the publisher.*

*- Chief & Executive Editor*

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS

For Details Visit To : www.researchjourney.net

*Cover Photo (Source) : Internet- Covid 19-Vaccination (Hon. Prime Minister of India Narendra Modi & Hon. President of U.S.A. Joe Biden)

© All rights reserved with the authors & publisher

Price : Rs. 1000/-

Assistant Professor
Shivaji College, Hingoli.
Tq. & Dist. Hingoli.(MS.)



56

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.625 (2019), Vol.-VIII, Issue-I (B)
Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
Jan.-March 2021

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | शीर्षक | लेखक/लेखिका | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| 01 | आदिवासी लोकगीतातील स्त्रीवास्तव | प्रा.राजू शनवार | 05 |
| 02 | दशावतार : एक लोककला | डॉ. अंजली मस्करेन्हस | 09 |
| 03 | तडवी समाज आणि संस्कृती | डॉ. धनराज धनगर | 15 |
| 04 | आंध्र प्रदेशातील विठ्ठल भक्तीचे स्वरूप | डॉ.प्रभाकर घोडके | 24 |
| 05 | देवदासी प्रथा धार्मिक व सांस्कृतिक परंपरा | डॉ.गजानन भामरे | 29 |
| 06 | तुकारामाची कविता - एक चिंतन | डॉ. निशा जोशी | 32 |
| 07 | रामदासांचे 'मनाचे श्लोक' : एक विश्लेषणात्मक चिंतन | प्रा. अमृता डोर्लीकर | 37 |
| 08 | ओवीगीतातील आई | डॉ. अनिता सोनवणे | 42 |
| 09 | राष्ट्रसंताच्या अभंग गाथेतील विविध देवता | डॉ. प्रवीण कारंजकर | 46 |
| 10 | उपेक्षितांचे जीवनदर्शन घडविणारी श्रेष्ठ कादंबरी 'बळी' | डॉ. रेखा वडिखाये | 51 |
| 11 | अण्णाभाऊ साठेंच्या महाराष्ट्र संसकृतीची यशोगाथा गौरवणाऱ्या पद्यरचना | प्रा. सोमनाथ पावडे | 57 |
| 12 | अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील भटक्या जमातींचे लोकजीवन | डॉ. राजेश्वर दुडूकनाळे | 61 |
| 13 | साठोत्तरी मराठी कवितेतील महानगरी आशयसूत्रे | डॉ. भरतकुमार मालेराव | 64 |
| 14 | ग्रामीण कादंबरीतील बदलते ग्रामवास्तव | डॉ. वाल्मिक आढावे | 71 |
| 15 | 'अजूनही बरंच काही बाकी' - दिनकर मनवर यांची कविता : एक चिंतन | डॉ. सुरेश वर्धे | 76 |
| 16 | मायबापाच्या जीवनाची व्यक्त झालेली विचार माळ : 'सूर्याची मशाल बाप माझा' | डॉ. प्रमोद गारोडे | 85 |
| 17 | डॉ. दिलीप धोंडगे यांचे ललित स्तंभलेखन : एक दृष्टीकोन | प्रा. विठ्ठल जाधव, डॉ. सुरेश जाधव | 91 |
| 18 | 'हरवलेली माणसं' निघालीत माणुसकीच्या शोधात ! | डॉ. मारोती घुगे | 95 |
| 19 | आदिवासी कादंबरीतील भिल्ल जमातीच्या लोकसंस्कृतीचा आविष्कार | प्रा. विनायक राऊत, डॉ. कांचन नलवडे | 102 |
| 20 | युवकांना आत्मबळ देणारा ग्रंथ : कर हर मैदान फतेह | डॉ. भाऊसाहेब गमे | 107 |
| 21 | भगतसिंग यांचे धार्मिक विचार | डॉ. राजेंद्र रासकर | 113 |
| 22 | भुसावळ तालुक्याचा भारतीय स्वातंत्र्य चळवळीत सहभाग | डॉ. जगन्नाथ गोपाळ | 118 |
| 23 | १९४२ च्या स्वातंत्र्य लढ्यादरम्यान रायगड जिल्ह्यातील सरकारी केंद्रावरील हल्ले | डॉ. भानुदास शिंदे | 123 |
| 24 | राजर्षी शाहू महाराज यांची कल्याणकारी राजकीय व्यवस्था | डॉ. देविदास नरवाडे | 126 |
| 25 | आधुनिक संदर्भात महात्मा गांधी यांच्या श्रमविषयक विचारांची उपयुक्तता | डॉ. जी. डी. घोडे | 130 |
| 26 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची वाचन अभिरुची व ग्रंथसंपदा | डॉ. प्रशांत पगाडे | 134 |
| 27 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा 'मूकनायक' आणि 'सामाजिक न्याय' विचार | डॉ. संभाजी पाटील, प्रा. बापूसाहेब जवळेकर | 138 |
| 28 | पंडित जवाहरलाल नेहरूंच्या परराष्ट्र धोरणाची प्रस्तुतता | डॉ.सुनिल पिंपळे | 149 |
| 29 | कर्मवीर भाऊराव पाटील यांचे अस्पृश्य निवारणाचे कार्य : एक चिंतन | प्रा. सुनिलदत्त गोडसे | 153 |
| 30 | महिला सशक्तीकरण धोरणाचा आढावा | डॉ. चांगदेव मुंढे | 156 |




Assistant Professor
Shivaji College, Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

57

| | | |
|---|---|---|
| 31 | महिलांचा राजकीय प्रचार मोहिमेतील सहभाग : विशेष संदर्भ कर्जत तालुका<br>डॉ. चंद्रकांत गोंधळी | 162 |
| 32 | मराठवाड्यातील महिला समुपदेशन केंद्रांची महिला तक्रार निवारणातील भूमिका : एक समाजशास्त्रीय अध्ययन<br>प्रा. श्रीमती इंदू साळुंखे | 170 |
| 33 | ओतारी समाजातील स्त्रीचे स्थान<br>प्रा. विक्रम ओतारी | 175 |
| 34 | लोणारी समाजातील विधवा महिलांच्या समस्येचा समाजशास्त्रीय दृष्ट्या अभ्यास<br>डॉ. संजय शिंदे | 178 |
| 35 | कोरोना काळात मोलकरणींच्या कुटुंबियांवर झालेल्या परिणामांचे अध्ययन<br>डॉ. नारायण गाढे | 189 |
| 36 | शेतकऱ्यांचे मानसिक आरोग्य- एक दृष्टिक्षेप<br>डॉ. अनिल वाघ | 193 |
| 37 | पश्चिम महाराष्ट्रातील प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांचा चिकित्सक अभ्यास<br>प्रीती दीक्षित, प्रा. ए. आर. मुंगी, प्रा. ए. वाय. दीक्षित | 199 |
| 38 | भारतातील राजकीय गुन्हेगारीकरण : एक अभ्यास<br>प्रा. ए. पी. वनारसे | 206 |
| 39 | गायत्री शक्तीपिठाच्या नवरात्री उत्सवातील मंत्रसाधना- वैज्ञानिक दृष्टी<br>डॉ. रजनी लुंगसे | 210 |
| 40 | बँकांचे विलीनीकरण धोरणाचा चिकित्सक आभ्यास<br>डॉ. नीता वाणी | 215 |
| 41 | स्वामीनाथन आयोगाचे अवलोकन<br>डॉ. एस. पी. देवरे | 220 |
| 42 | केंद्रीय कृषी योजना : सिंहावलोकन<br>डॉ. एम. व्ही. हिरे | 224 |
| 43 | प्रधानमंत्री मुद्रा योजना - अवलोकन<br>डॉ. आर. के. जाधव | 228 |
| 44 | मुलभूत सुविधा आणि कृषी विकास<br>डॉ. बी. एम. सोनवणे | 232 |
| 45 | ग्रामीण विकासात लोकांच्या सहभागाची आव्हाने<br>डॉ. मारुती केकाणे | 236 |
| 46 | टाळेबंदी (लॉक डाऊन) नंतरची ग्रामीण अर्थव्यवस्था - विशेष अभ्यास<br>डॉ.सुरेश ढाके | 244 |
| 47 | भारतीय नवीन कृषी धोरण २०२० : एक दृष्टिक्षेप<br>डॉ. गोरखनाथ वाकळे | 249 |
| 48 | नवीन कृषी धोरण (कायदे) २०२० : संधी आणि समस्या<br>प्रा. देवानंद मंडवधरे | 254 |
| 49 | राष्ट्रीय कृषी धोरण २०२० : एक विश्लेषणात्मक अभ्यास<br>डॉ. रामदास मुक्टे | 259 |
| 50 | कोल्हापूर विभागातील १९ वर्षे वयोगटातील खेळाडूंच्या शारीरिक क्षमतेचे घटक आणि हँडबॉल कौशल्यांच्या दर्जाचा अभ्यास<br>श्रीनिवास पाटील | 265 |
| 51 | व्यक्तिमत्त्व विकासात खेळाचे महत्व<br>डॉ. मनिष देवरे | 272 |
| 52 | विना साहित्य व्यायामाचा कुमार गटातील विद्यार्थ्यांच्या स्नायूंची ताकद व दमदारपणावर होणारा परिणाम<br>विशाल गायकवाड, आदित्य कुलकर्णी | 276 |
| 53 | कोल्हापूर विभागातील १९ वर्षे वयोगटातील हँडबॉल खेळाडूंच्या शारीरिक क्षमतेचे घटक आणि हँडबॉल कौशल्य यातील सहसंबंधाचा अभ्यास<br>श्रीनिवास पाटील | 279 |
| 54 | भगतसिंग यांचे युवकांच्या संबंधीचे विचार<br>डॉ. राजेंद्र रासकर | 285 |
| 55 | आधुनिक ज्ञानयुगाचा सारथी : शिक्षक<br>श्री.विपीन वैराट | 289 |
| 56 | उच्च शिक्षणात माहिती व तंत्रज्ञानाचे महत्त्व<br>डॉ. अनमोल शेंडे | 295 |
| 57 | विधीसंघर्षग्रस्त मुलांची प्रवृत्ती<br>डॉ. अशोक सातपुते | 300 |
| 58 | राष्ट्रीय शिक्षण धोरण आणि आप्तवाक्य : एक तात्त्विक विश्लेषण<br>डॉ.राजेसाहेब मारडकर | 304 |
| 59 | गावडी बोलीचो व्याकरणीक आनी भासविज्ञानीक नदरेंतल्यान अभ्यास<br>दिपराज सातोर्डेकार | 311 |




Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

58

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.625 (2019),
Vol.-VIII, Issue-I (B)
Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
Jan.-March 2021

# राष्ट्रीय कृषी धोरण २०२० : एक विश्लेषणात्मक अभ्यास

डॉ. रामदास डी. मुक्टे
शिवाजी महाविद्यालय, हिंगोली. (महा.)

## प्रस्तावना

भारतीय कृषी क्षेत्र स्वातंत्र्यपूर्व काळापासून ते आजपर्यंत अर्थव्यवस्थेतील एक महत्त्वाचे क्षेत्र आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात व स्वातंत्र्य नंतरही जवळपास 1960 च्या दशकापर्यंत औद्योगिक व सेवा क्षेत्राच्या तुलनेत अर्थव्यवस्थेच्या विकासामध्ये कृषी क्षेत्राची भूमिका महत्त्वपूर्ण होती. अर्थव्यवस्थेच्या विकासा बरोबर औद्योगिक व सेवा क्षेत्राचे महत्त्व कृषी क्षेत्राच्या तुलनेने वाढत गेले व कृषी क्षेत्राची महत्त्व कमी होत गेले. 'स्वातंत्र्योत्तर काळामध्ये 1951 मध्ये जवळपास 36 टक्के कोटी भारताची लोकसंख्या होती ती 2011 मध्ये 121 कोटी झाली. सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे 121 कोटी लोकसंख्येपैकी जवळपास 83 कोटी लोकसंख्या ही आजही शेती आणि संलग्न व्यवसायावर अवलंबून आहे.ही लोकसंख्या भारताच्या एकूण लोकसंख्येच्या 68.9 टक्के इतकी आहे. दुसरीकडे 1950-51 मध्ये भारताच्या कृषी क्षेत्राचा स्थूल देशांतर्गत उत्पादनात असणारा वाता 55.4 टक्के होता,तो 2011-12 मध्ये 13.9 टक्के आहे.आकडेवारीच्या दुसरा अर्थ असा आहे की,कृषी आणि संलग्न क्षेत्रात काम करणाऱ्या 68.9 टक्के लोकसंख्येला राष्ट्रीय उत्पन्नातील केवळ 13.5 वाटा मिळतो.कारखानदारी व सेवा क्षेत्र कार्यरत असणाऱ्या केवळ 31.1 टक्के लोकसंख्येला राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा 86.1 मिळतो.'1 ही आकडेवारी भारताच्या कृषी क्षेत्रातील समस्यांची भयानकता स्पष्ट करण्यास पुरेशी आहे. परंतु आजही अर्थव्यवस्थेत सर्वात जास्त रोजगार निर्मितीचे क्षेत्र म्हणून आणि विशेषतः ग्रामीण भागातील जनतेच्या उपजीविकेचे प्रमुख साधन म्हणून शेती क्षेत्र ही ओळखले जाते.

एका काळात अर्थव्यवस्थेमध्ये सुजलाम-सुफलाम असणारे कृषी क्षेत्र आज अनेक समस्यांच्या विळख्यात अडकलेले दिसून येते. कृषी व्यवसाय करणाऱ्या व्यवसायिकामध्ये मोठ्या प्रमाणात नैराश्य निर्माण होऊन व्यावसायिक आत्महत्या सारख्या पर्यायांचा स्वीकार करत असल्याचा दिसून येतात.शेतकऱ्यांच्या मजबुरीचा मध्यस्थ फायदा घेत कृषी बाजारपेठेमध्ये एक मोठा मध्यस्थी वर्ग निर्माण झाला असून तो शेतकऱ्या पेक्षा अधिक नफा मिळवत असल्याचे दिसून येते. कृषी क्षेत्रातील कृषी लागवड ते उत्पादन व विक्री पर्यंतच्या अनेक टप्प्यांमध्ये समस्या दूर करून भारतीय कृषी क्षेत्राचा व पर्यायाने भारतीय शेतकऱ्यांचा विकास करण्याचा उद्देश समोर ठेवून भारत सरकारने 20 सप्टेंबर 2020 रोजी नवीन कृषी धोरण जाहीर केले. या धोरणामध्ये नवीन दोन कायद्याची निर्मिती केली व पूर्वीच्या एका कायद्याने मध्ये बदल करण्यात आला आहे.

## संशोधनाची आवश्यकता

भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या कृषी क्षेत्रामध्ये आमुलाग्र बदल घडवून आणण्याच्या उद्देशाने भारताचे कृषिमंत्री श्री नरेंद्र सिंह तोमर यांनी 20 सप्टेंबर 2020 रोजी लोकसभेत नवीन कृषिविषयक विधेयक सादर केले.परंपरेने चालत आलेल्या कृषी बाजारपेठेचे स्वरूप यामध्ये बदलण्यात आले तसेच कंत्राटी शेतीला मान्यता देऊन शेती क्षेत्रामध्ये खाजगीकरणाला संधी देण्याचेही प्रयत्न या ठिकाणी करण्यात आला आहे की, जेणेकरून शेती क्षेत्रामध्ये खाजगी गुंतवणूक वाढेल ही अपेक्षा या ठिकाणी व्यक्त करण्यात आली.जीवनावश्यक वस्तूंच्या कायद्यातून काही कृषी उत्पादने वगळण्यात आली. या बदलाचा भारतीय कृषी क्षेत्र व संबंधित



Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

व्यावसायिक, शेतकरी यांच्यावर नवीन कृषी धोरण, कायदे व कायद्यातील बदलाचा काय प्रभाव होईल ही आवश्यकता लक्षात घेऊन प्रस्तुत संशोधन कार्य करण्यात आले आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे**

1) नवीन कृषी धोरणामध्ये करण्यात आलेल्या कायद्याचा अभ्यास करणे.
2) नवीन कृषी धोरणाचा भारतीय कृषी क्षेत्र व संबंधित व्यवसायिकांना शेतकऱ्यांना होणारा लाभांचा अभ्यास करणे.
3) नवीन कृषी धोरणातील कायद्यामुळे व पूर्वीच्या कायद्यात केलेल्या बदलामुळे भारतीय कृषी क्षेत्र व शेतकऱ्यांपुढे निर्माण होणाऱ्या आव्हानाचा आढावा घेणे.

**संशोधनाची गृहिते**

1) परंपरागत चालणाऱ्या कृषी क्षेत्रामध्ये नवीन कृषी धोरणामुळे कृषी क्षेत्रात मोठे बदल घडून येतील.
2) खाजगीकरणाला चालना देण्याचे कार्य नवीन कृषी धोरण यामध्ये करण्यात आले आहे.
3) कृषि व्यावसायिक व संबंधित घटकांना या कायद्यामुळे लाभ मिळणार आहेत तर काही प्रमाणात त्यांच्या पुढे आव्हानही उभे टाकणार आहेत.

**नवीन कृषी धोरण**

भारतीय अर्थव्यवस्थेतील अतिशय महत्त्वपूर्ण क्षेत्र असलेल्या या कृषी क्षेत्रामध्ये कृषी उत्पादनापासून विक्रीपर्यंत अनेक वर्षापासून चालत आलेल्या पद्धतीमध्ये बदल घडून आणण्याच्या,भारतीय कृषी क्षेत्रात चे स्वरूप बदलण्याच्या आणि कृषी व्यवसाय करणाऱ्या व्यवसायिक व शेतकऱ्यांमध्ये शेतकऱ्यांच्या उत्पन्नामध्ये बदल घडून आणण्याच्या व पर्यायाने त्यांचा विकास होण्याच्या उद्देशाने 'भारताचे कृषी मंत्री यांनी संसदेच्या सभागृहामध्ये 20 सप्टेंबर 2020 रोजी नवीन कृषी धोरण की, ज्यामध्ये कृषी क्षेत्राच्या संबंधित दोन नवीन कायदे व पूर्वीच्या एका कायद्यामध्ये बदल करून असे एकूण तीन कायदे तयार करण्यात आले.'2 त्यामुळे कृषी क्षेत्रामध्ये पूर्वी चालत आलेल्या अनेक पद्धती संपुष्टात येऊन नवीन पद्धतीने चालना देण्याचे काम या ठिकाणी करण्यात आले आहे. आतापर्यंत शेतमाल खरेदी-विक्री मार्केट कमिटी अंतर्गत विक्री केला जात होता त्यामुळे शेतकऱ्यांना बंदिस्त करण्यात आले होते. शेतकरी उत्पादक व ग्राहक यांच्यामध्ये एक मोठा दलाल वर्ग तयार झाला होता हा वर्ग म्हणजे एक ताकतवान व बलशाली वर्ग झाला कारण उत्पादक शेतकरी यांच्यापेक्षाही अधिक नफा तो दलाल कामत होता. हा वर्ग शेतकऱ्यांच्या निरक्षरतेचा,भोळेपणाचा गैरफायदा घेत असल्यामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान होत होते. त्यामुळे दलालांच्याजाळयातून शेतकऱ्यांना मुक्त करणे,त्यांच्या मालाची विक्री करण्याचे त्यांना स्वातंत्र्य देणे,त्याच बरोबर नवीन बाजारपेठा निर्माण करणे व कृषी क्षेत्रामध्ये खाजगी गुंतवणूकीला चालना देण्याच्या उद्देशाने या धोरणामध्ये बदल करण्यात आला आहे.

**नवीन कृषी कायदे व त्यांचे विश्लेषण**

**1) शेतकरी उत्पादने व वाणिज्य प्रोत्साहन व सुविधा कायदा 2020**

हा पहिला कायदा कृषिमाल खरेदी-विक्री संबंधित आहे.त्यामध्ये प्रमुख तरतुदी अशा आहेत की, 'कृषी उत्पन्न बाजार समितीने मान्यता दिलेल्या बाजारा बाहेर शेतकरी आपल्या शेतमालाची विक्री करू शकतात म्हणजेच नवीन कृषी बाजारपेठ कृषी उत्पन्न बाजारपेठ च्या बाहेरही तयार करण्यास मान्यता देण्यात आली आहे.'3 राज्यांच्या व आंतरराज्य कृषिमाल वाहतुकी मधील व विक्री मधील अडचणी दूर करण्यात आल्या आहेत.म्हणजेच कृषिमाल देशांमध्ये शेतकरी कोणत्याही राज्यामध्ये कोणत्याही ठिकाणी तो विक्री करू शकेल.



Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

त्यावर विक्री करण्याचे व मालाची वाहतूक करण्याची कुठलीही बंधने राहणार नाहीत. कृषिमाल विक्रीसाठी ई-ट्रेडिंग व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आली आहे.की,ज्यामुळे शेतकरी ऑनलाईन पद्धतीने मालाची विक्री करू शकेल शेतकऱ्यांना मालाची विक्री लवकरात लवकर करता करता येईल मोठ्या प्रमाणात ग्राहक मिळतील व मालाला चांगली किंमत मिळेल आणि शेतकऱ्यांचे होणारे नुकसान कमी होऊन शेतकऱ्यांच्या उत्पन्नामध्येमोठ्या प्रमाणात वाढ होईल ही अपेक्षा या ठिकाणी आहे.

**2) शेतकरी (सशक्तीकरण आणि स्वरक्षण) किंमत आश्वासन आणि कृषी सेवा करार 2020**

हा कायदा 'शेतकऱ्यांच्या आत्मबल वाढवणे त्यांचे सशक्तीकरण करणे आणि त्यांना संरक्षण देणे यासंदर्भात आहे. या कायद्यामध्ये शेतकऱ्यांना त्यांच्या मालाला सरकार कडून हमी भाव मिळेल किंवा शेतकऱ्यांना त्यांच्या मालाला चांगल्या पद्धतीची किंमत मिळेल अशा प्रकारचे आश्वासन देण्यात आले आहे.'4 कृषी क्षेत्रासाठी गोडाऊन,वाहतूक-दळणवळण व विद्युत यासारख्या सुविधाही उपलब्ध करून देण्याचे या ठिकाणी मान्य करण्यात आले आहे.लहान शेतकऱ्यांना आधुनिक शेती करणे परवडण्यासारखे नाही अशा साठी कंत्राटी शेतीची संकल्पना विकसित करण्यात आली व तिला कायद्याचे स्वरूप या ठिकाणी देण्यात आले आहे.त्यामुळे लहान-लहान अनेक शेतकरी एकत्र येऊन विकसित शेती करू शकतील. शेतकरी घेत असलेल्या पिकाच्या संदर्भामध्ये घाऊक खरेदीदार, ट्रेडिंग कंपनी यांच्याकडून कृषिमाल खरेदी व किमती संदर्भामध्ये सुरुवातीलाच करार केला जाईल त्यामुळे शेतकऱ्यांना आपल्या पिकांच्या किंमती व खरेदी ची याठिकाणी हमी उपलब्ध होईल.त्याच बरोबर पुढील पिकांसाठी सुद्धा करार करण्याची तरतूद या ठिकाणी आहे. यामुळे शेतकऱ्यांना पिकाच्या लागवड नंतर मालाच्या किंमतीच्या काही प्रमाणात अग्रीम रक्कम उपलब्ध होईल. याचा परिणाम म्हणून असा होईल की,बाजारपेठेतील किंमती संदर्भात जी अनिश्चितता आहे ती अनिश्चितता दूर होऊन शेतकऱ्यांचे नुकसान होणार नाही. त्याच बरोबर मध्यस्थांची भूमिका या ठिकाणी राहणार नाही कारण ट्रेडिंग कंपनी व शेतकरी यांच्यामध्ये सरळ व्यवहार होईल त्यामुळे मध्यस्थ कडून होणारी लूट ही या ठिकाणी थांबले.

**3) अत्यावश्यक वस्तू (दुरुस्ती) कायदा 2020**

कृषी धोरणामधील हा तिसरा कायदा आहे. '1954 चा हा कायदा दुसऱ्या महायुद्धानंतर भारतीयांवर लादण्यात आला होता. या कायद्यात बदल करून नवीन कायद्यांची निर्मिती केली आहे.अत्यावश्यक वस्तूच्या यादी मधून काही कृषी उत्पादने कमी करण्यात आले आहे त्यामध्ये डाळी,कडधान्य तेलबिया कांदे बटाटे अशा वस्तूंचा समावेश आहे.'5 या बदलामुळे अत्यावश्यक वस्तू मधून वगळण्यात आलेल्या वस्तूंच्या साठा करणे संदर्भात कुठल्याही प्रकारचे निर्बंध आता राहणार नाही त्यामुळे अनेक ट्रेडिंग कंपन्या,उद्योजक व व्यावसायिक बाजारपेठेत खरेदीसाठी येतील. त्यामुळे याचा परिणाम असा होईल की कृषी वस्तूंना मागणी जास्त असेल त्यांच्या किमतीमध्ये वाढ होऊन शेतकऱ्यांना चांगल्या प्रकारचे उत्पन्न प्राप्त होईल. परकीय व खाजगी गुंतवणुकदार या ठिकाणी गुंतवणूक करण्यास तयार होतील.बाजारपेठेमध्ये किमती स्थिर राहण्यास मदत होईल याचा लाभ ग्राहकांना होईल.अशा पद्धतीने ग्राहक,उत्पादक शेतकरी,व्यापारी व उद्योजक या सर्वांचा या दुरुस्ती विधेयकामुळे लाभ होईल अशी अपेक्षा आहे.

**कृषी धोरणाचे फायदे**

1) कृषी मालाची कृषी उत्पन्न बाजार समितीच्या क्षेत्राबाहेर विक्री करता येईल.



Ghodekar
Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.625 (2019),
Vol.-VIII, Issue-I (B)
Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
Jan.-March 2021

2) कृषिमाल विक्रीसाठी बाजारपेठ विकसित होऊ जिल्ह्या,राज्याबाहेरही मालाची विक्रीची संधी प्राप्त झाली.
3) कृषी माल विक्रीवर कुठल्याही प्रकारचे शुल्क लागणार नाही.
4) शेतकऱ्यांची दलालांकडून होणारी फसवणूक व लूट थांबेल.
5) कृषी बाजारपेठेतील दलाल ही संकल्पना संपुष्टात येईल.
6) शेतकरी आपल्या या मालाची विक्री संदर्भात विक्री पूर्वी व्यापारी,उद्योजक,ट्रेडिंग कंपनी यांच्याशी करार करेल व त्यानुसार ठरलेल्या किंमती प्रमाणे विक्री करेल यामुळे त्याच्या अपेक्षित किंमत उपलब्ध होईल.
7) कृषिमाल विक्री करारामुळे शेतकऱ्यांची मालाची विक्री व किमती संदर्भातील अनिश्चितता दूर होईल.
8) कृषिमाल विक्री करत असताना शेतकऱ्यांना वेगवेगळया ठिकाणी जो खर्च करावा लागत होता तो खर्च आता करावा लागणार नाही.
9) ई-ट्रेडिंग बाजाराची सुविधा उपलब्ध झाल्यामुळे शेतकऱ्यांना आपल्या शेतातून मालाची विक्री करता येईल.
10)बहुतांश शेतकरी हे निरक्षर असल्यामुळे मालाची विक्री करताना बार्गेनिंग करावी लागते त्या ठिकाणी कमी पडतात अशा शेतकऱ्यांस लाभ होईल.
11)लहान शेतकरी जॅकी शेतीमध्ये गुंतवणूक करू शकत नाही किंवा शेतीचे आधुनिकीकरण करू शकत नाही अशांना कंत्राटी शेतीचा लाभ होईल.
12)अत्यावश्यक वस्तू मधून कृषी वस्ती वस्तू वगळण्यात आल्याने त्या वस्तूंच्या साठवणीतील कुठल्या प्रकारचे निर्बंध असणार नाही त्यामुळे खाजगी गुंतवणुकदार ट्रेडिंग कंपनी या वस्तू खरेदीसाठी बाजारपेठेमध्ये येतील याचा परिणाम म्हणून शेतकऱ्यांना त्यांच्या मालाला चांगल्या पद्धतीचे किंमत उपलब्ध होईल.
13)कंत्राटी शेती,व्यापारी पिके,ई-ट्रेडिंग या सारख्या नवीन संकल्पनामुळे खाजगी भारतीय व विदेशी गुंतवणूकदार शेती क्षेत्रामध्ये करण्यास तयार होतील.
14)कृषी उत्पन्न बाजार समितीच्या क्षेत्राबाहेर मालाला कमी भाव मिळत असेल तर सरकार च्या आश्वासना प्रमाणे शेतकऱ्यांना परत कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये मालाची विक्री करण्याची पर्याय या ठिकाणी उपलब्ध आहे.
15)शेतकऱ्यांना स्वतः मालाची किंमत ठरवता येईल.
16)ज्या शेतकऱ्याकडे पॅन कार्ड आहे असे शेतकरी एकत्र येऊन कृषी उत्पादन कंपनीच्या माध्यमातून किंवा शेतकरी कंपनीच्या माध्यमातून कृषी बाजारपेठेत मालाची खरेदी-विक्री मध्ये सहभाग घेऊ शकतात.

इत्यादी प्रकारचे लाभ किंवा फायदे भारत सरकारच्या नवीन कृषी धोरणाचे दिसून येतात. ज्यामुळे भारतीय शेतकरी खरेदीदार व्यापारी व ग्राहक या तिघांनाही कमीं अधिक प्रमाणात लाभ होताना दिसतात.

**कृषी धोरणामुळे निर्माण झालेली आव्हाने**

1) कृषी उत्पन्न बाजार समित्या बंद पडतील त्यानंतर कृषिमाल विकण्याच्या समस्या निर्माण होतील.खाजगी व्यापारी ट्रेडिंग कंपनी उद्योजक यांच्याकडून शेतकऱ्यांच्या मालाची कमी किमतीला खरेदी केली जाईल.



Assistant Professor
Shivaji College, Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

2) कृषीच्या मालाला हमीभाव देण्याचे आश्वासन सरकार देत आहे परंतु कायद्यामध्ये त्याचे रूपांतर न केल्या मुळे हे आश्वासन पूर्ण होईल किंवा नाही हा प्रश्न शेतकऱ्यांपुढे आहे.
3) कृषी उत्पन्न बाजार समित्या बंद पडल्या तर राज्य सरकारांचा मिळणारा कर आता मिळणार नाही.
4) कृषी क्षेत्रामध्ये राष्ट्रीय व बहुराष्ट्रीय कंपन्या व खाजगी कंपन्या उतरतील त्यामुळे शेतकऱ्यांच्या निरक्षरतेचा व मजबुरीचा खाजगी कंपन्यांकडून फायदा घेतला जाईल व शेतकऱ्यांचे नुकसान होईल.
5) शेतकरी व उद्योजक व्यापारी यांच्यामध्ये जो करार होईल त्या कराराचे पालन व्यापाऱ्यांनी केले नसल्यास त्यावर कारवाई करण्याची स्थानिक सरकारवर जबाबदारी दिली आहे तेव्हा शेतकऱ्यांना न्याय मिळेल का हा प्रश्न आहे.
6) बाजार समित्या संपुष्टात आल्यामुळे दलाल, आडते,हमाल व इतर या ठिकाणी काम करणारे वर्ग यांच्यावर बेकारीची वेळ येईल.
7) सरकारचा हस्तक्षेप कमी झाल्यामुळे शेतकऱ्यांचा आधारस्तंभ जो की,संकटकाळी त्यांच्या पाठीमागे उभा असतो त्यांना मदत करतो तो आता नसेल.
8) व्यापारी, ट्रेडिंग कंपनी,व कंत्राटी शेती यासंदर्भात न्यायालयात दाद मागण्याची तरतूद शेतकऱ्यांना नाही.
9) भारतीय शेतकऱ्यांमध्ये निरक्षरतेचे मोठे प्रमाण आहे त्यामुळे ई-ट्रेडिंग बाजार यंत्रणेचा लाभ शेतकरी घेऊ शकणार नाहीत.
10) हमीभाव ही संकल्पना संपुष्टात आल्यामुळे आपल्या मालाला योग्य किंमत मिळेल किंवा नाही ही अस्वस्थता शेतकऱ्यांमध्ये निर्माण होईल.

अशा प्रकारचे काही आव्हाने नवीन कृषी धोरणामुळे निर्माण झाल्याचे सांगता येतील.

**संशोधनाचे निष्कर्ष**

1) भारतीय कृषी क्षेत्रामध्ये आधुनिकतेचा अभाव आहे अशा स्थितीत कृषी क्षेत्रात बदल होणे अपेक्षित आहे ते या कायद्यामुळे होतील.
2) भारतीय शेतकऱ्यांनी बदलत्या परिस्थितीनुसार शेती व्यवसायाचे स्वरूप बदलणे अपेक्षित आहे त्यामुळे शेतकऱ्यांनी या धोरणाकडे सकारात्मक दृष्टीने बघणे आवश्यक आहे.
3) भारतीय शेतकरी हा निरक्षर आहे तो ग्रामीण भागात राहतो की,ज्या ठिकाणी आधुनिक सोयीसुविधांचा अभाव आहे अशा स्थितीत या धोरणाचा शेतकऱ्यांना किती प्रमाणामध्ये लाभ होईल हे निश्चित सांगता येत नाही.
4) या कृषी धोरणामुळे कृषी बाजारपेठांचा विकास होऊन ग्राहकांची संख्याही वाढेल कृषी मालाला चांगले किंमत मिळेल ही अपेक्षा आहे.
5) कृषीमाल साठवणूक वाहतूक खरेदी-विक्री यांच्यावरील निबंध उठवल्यामुळे शेतकऱ्यांना याचा फायदा होईल परंतु सरकारचे यासंदर्भात अनुकूल धोरण असले तरच या बदलांचा अनुकूल परिणाम होईल अन्यथा जर शेतकऱ्यांनी कृषी वस्तूच्या निर्यातीवर बंदी घालण्यासारखे धोरणे अवलंबिले तर शेतकऱ्यांना त्याचा लाभ होणार नाही.
6) कंत्राटी शेतीमुळे तुकडी करण्यासारखी समस्या दूर शकते.
7) शेती क्षेत्रातील गुंतवणुकीचा अभाव या धोरणामुळे दूर होईल.



Assistant Professor
Shivaji College, Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(M.S.)

8) कृषी उत्पन्न बाजार समितीची संकल्पना संपुष्टात आली तर राज्य सरकारचे महत्त्व कमी होऊन त्यांच्या महसुलात घट होऊ शकते.

9) नवीन कृषी धोरणाचे भारतीय शेतकऱ्यांना व शेती संबंधित व्यवसायिक व्यवसायिकांना किती प्रमाणात लाभ होईल हे धोरणाची अंमलबजावणी झाल्यानंतरच लक्षात येईल त्यामुळे सध्याच्या परिस्थितीत तरी या धोरणाकडे अनुकूलतेने बघणे आवश्यक आहे.

**सारांश**

भारतीय अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्र हे अतिशय महत्वपूर्ण क्षेत्र आहे परंतु या क्षेत्रामध्ये अनेक समस्या स्वातंत्र्यपूर्व काळापासून आजही बघायला मिळतात. त्यामध्ये विशेषतः भांडवल गुंतवणुकीचाअभाव,निसर्गावरील मोठे अवलंबित्व, व्यापारी पिकांचा अभाव, आधुनिकतेचा अभाव या समस्या नवीन कृषी धोरणाच्या मदतीने दूर होतील ही अपेक्षा व्यक्त करता येते.धोरणाचे किती प्रमाणात शेतकरी व शेती व्यवसायिकांना मिळतील किंवा या धोरणाचे काय दुष्परिणाम शेतकरी व शेत व्यवसायिकांना यांना होतील होतील हे कृषी धोरणाचे अंमलबजावणी झाल्यानंतरच लक्षात येईल. यामध्ये एक महत्त्वाची गोष्ट ती म्हणजे सरकारचा हस्तक्षेप संपूर्ण कृषी क्षेत्र कृषी,बाजारपेठ या मध्ये असणे आवश्यक आहे.कारण भारतीय शेतकरी हा भोळा असून या भोळेपणाचा फायदा व्यापारी उद्योजक हे घेऊ शकतात.

**संदर्भ सूची**

1. ttps://www.deshdoot.com
2. www.maharashtratimes.com
3. कित्ता
4. www.bbc.com

इतर:-

- दैनिक लोकसत्ता दि.22/9/20
- दैनिक लोकसत्ता दि.23/9/20
- दैनिक देशोन्नती दि.27/9/20
- दैनिक लोकमत दि.22/9/20
- दूरदर्शन, बातमी टि.व्ही वहिनी दि.20,21/9/20
- ऑनलाइन यूट्यूब चैनल दि.14/2/21



Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

64